**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा निशाणी १०२ वरील आदेशानुसार उलटतपास शपथेवर सुरु</u>-**

मी ज्ञानदेव वसंत साळगांवकर, वय ५८ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त, निमतानदार, रा. वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की,

**<u>वादी तर्फे श्री. ए. ए. मालवणकर, वकील</u> -**

**१.** न्यायालयाने कोर्ट कमिशनचे कामी पाठविलेले पत्र आज मी अभिलेखासोबत आणलेले आहे. त्या पत्रानुसार मला न्यायालयाने निशाणी २४ वरील आदेशाप्रमाणे काम करण्याचे आदेश केले होते. मला न्यायालयाच्या पत्रासोबत निशाणी २४ च्या आदेशाची प्रत सुध्दा प्राप्त झाली होती. तो आदेश वाचल्यावर माझे लक्षात आले की, मौजे बांबडे तर्फ माणगांव येथील सर्व्हे नंबर ८४/४ मध्ये अतिक्रमण आहे किंवा नाही याची पाहणी करुन अहवाल सादर करावयाचा होता. मी मोजणीचे कामी दि. २२/११/२०११ व दि. २३/११/२०११ रोजी मोजणी कामी प्रत्यक्ष जागेवर गेलो. मोजणीला जाण्यापूर्वी मी उभय पक्षकारांना रजिस्टर पोष्टाने नोटीसेस पाठविल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात हजर केलेल्या अहवालासोबत मी नोटीसेस संबंधित पक्षकारांना मिळाल्याबाबतच्या पोहोच पावत्या हजर केलेल्या नाहीत. *आता साक्षीदारास निशाणी ५२ चा अहवाल दाखविला.*

**२.** तो अहवाल आमच्या कार्यालयामार्फतच मी केलेल्या मोजणीबाबतचा अहवाल आहे. अहवालासोबत मी कमिशन पत्र, वगैरे सर्व दस्तऐवज पाठविले आहेत. *आता साक्षीदारास निशाणी १०९ चा नकाशा दाखविला.* तो नकाशा आमच्याच कार्यालयाने दिलेला आहे. तो नकाशा मूळ अभिलेखावरुन तयार केलेला आहे. तो मूळ अभिलेखा बरोबर तंतोतंत जुळणारा आहे. त्या नकाशात सर्व्हे नंबर ८४/१ ते ८४/६ असे सहा हिस्से नमूद आहेत. निशाणी १०९ च्या नकाशानुसार सर्व्हे नंबर ८४/४ च्या पश्चिमेस सर्व्हे नंबर ८४/३ आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या नकाशात दिशा दर्शविलेली नसते त्या नकाशाचा वरचा भाग उत्तर दिशा आहे, असे गृहित धरले जाते व त्याप्रमाणे त्याच्या चतु:सीमा मांडल्या जातात. निशाणी १०९ नुसार सर्व्हे नंबर ८४/४ च्या उत्तर व पूर्व दिशेस सर्व्हे नंबर ७३, दक्षिणेस सर्व्हे नंबर ८२, पूर्वेस सर्व्हे नंबर ७४, अशा चतु:सीमा आहेत.

**३.** कोणत्याही मोजणीला जाण्यापूर्वी प्रमाणभूत म्हणून आमच्या कार्यालयातील मूळ अभिलेख आम्हांला न्यावा लागतो. प्रस्तुत कामाचा प्रमाणभूत नकाशा निशाणी १०९ चा नकाशा आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी जागेवर मोजणी केली जाते त्यावेळी नकाशाची 'ब' प्रत तयार केली जात नाही. त्यावेळी जागेवर 'अ' प्रत तयार केली जाते. जागेवर मूळ अभिलेखावरुन ट्रेसिंग पेपरने ट्रेस केलेला अभिलेखातील नकाशा नेला जातो. हे म्हणणे खरे आहे की, ही संपूर्ण माहिती आम्हांला सांभाळून

आमच्या कार्यालयाच्या अभिलेखात ठेवावी लागते. निशाणी १०९ च्या नकाशाचे प्रमाण १ : ८००० असे आहे. मी न्यायालयात सादर केलेल्या अहवालाचे प्रमाणे १ : १००० असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोन्ही नकाशांमधील प्रमाण भिन्न असले तरी दिशा व चतु:सीमा सारख्याच राहतील, त्या बदलणार नाहीत.

**४.** मोजणीत ‘क’ प्रत सुध्दा तयार करण्यात येते. परंतु ‘क’ प्रत ही आमच्या कार्यालयाकडे अर्ज देवून व फी भरुन जी मोजणी केली जाते त्याच्यातच संबंधित पक्षकारांसाठी तयार केली जाते. न्यायालयामार्फत करण्यात आलेल्या मोजणी प्रकरणांमध्ये तशी प्रत तयार केली जात नाही. *आता साक्षीदारास निशाणी ४ सोबत अ.क्र. १३ अन्वये दाखल केलेला नकाशा दाखविला.*

**५.** तो नकाशा आमच्या कार्यालयाकडूनच दिलेला आहे. तो नकाशा सुध्दा मोजणीबाबतचाच आहे. तो नकाशा मोजणी रजिस्टर नंबर २५४/०७-०२-१९८९ मधील मोजणीचा आहे. ती मोजणी सर्व्हे नंबर ८४/४ आणि सर्व्हे नंबर ८३/० यांची झाल्याची दिसते. जोपर्यंत हद्द ठराव मोजणी वरिष्ठ अधिका-यांकडून रद्द केली जात नाही तोपर्यंत हद्द ठराव मोजणी अंतिम आहे, असे गृहित धरले जाते. त्या नकाशात सर्व्हे नंबर ८४/३ च्या पूर्वेस सर्व्हे नंबर ८४/४ आहे. निशाणी १०९ मध्ये सुध्दा सर्व्हे नंबर ८४/३ च्या पूर्वेस सर्व्हे नंबर ८४/४ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोन्ही नकाशांमधील सर्व्हे नंबर ८४/३ व सर्व्हे नंबर ८४/४ च्या दिशांची परिस्थिती सारखीच आहे.

**६.** *आता साक्षीदारास अहवाल, निशाणी ५२ सोबत हजर केलेला नकाशा दाखविला.* तो नकाशा तयार करण्यासाठी मी सर्व्हे नंबर ८४/३ आणि सर्व्हे नंबर ८४/४ या मिळकतींची मोजणी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाच्या आदेशानुसार मला दावा मिळकतीची मोजणी करण्याचे आदेशित करण्यात आले होते. मला आलेल्या पत्रानुसार दावा मिळकत सर्व्हे नंबर ८४/४ आहे, असे समजले. मी सर्व्हे नंबर ८४/३ ची मोजणी सुध्दा केली, कारण ती प्रतिवादीची मिळकत होती आणि आदेशाप्रमाणे लगतच्या मिळकतींची सुध्दा मोजणी केली, त्या मिळकतींची मोजणी केल्याशिवाय अतिक्रमण केले आहे किंवा नाही, असा तर्क काढता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ५२ सोबत जोडलेल्या ‘ब’ प्रतीत सर्व्हे नंबर ८४/३ आणि सर्व्हे नंबर ८४/४ नेमका कोणता आहे, याचा अर्थबोध होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसा उल्लेख नकाशात नाही. हे म्हणणे खरे आहे की, फक्त नकाशाच्या आधारे त्या हिश्श्यांचा कोणताही अर्थबोध होत नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, नकाशातील चिन्हाच्या आधारे नकाशातील वरची बाजू उत्तर बाजू आहे. हे म्हणणे खरे आहे की, नकाशात दाखविलेले पोटहिस्से उत्तर-दक्षिण, असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १०९ च्या नकाशात ते दोन्ही हिस्से पूर्व-पश्चिम वसल्याचे दिसत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १०९ च्या नकाशात नमूद केलेल्या मिळकतींच्या दिशा अहवालासोबत दाखल केलेल्या नकाशा सोबत जुळत नाहीत. निशाणी ५२ सोबत दाखल केलेल्या नकाशात वरील उत्तरेकडील भाग सर्व्हे नंबर ८४/३ आहे आणि खालील दक्षिणेकडील भाग सर्व्हे नंबर ८४/४ आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो नकाशा मूळ अभिलेखाप्रमाणे तयार करणेत आलेला नाही.

८. खुलासा टिपेतील शेवटच्या टिपेत नमूद केलेप्रमाणे नकाशातील सी-डी-एच-एफ-जी-आय या रेषेने दर्शविलेला भाग सर्व्हे नंबर ८४/४ ची मूळ अभिलेखाप्रमाणे हद्द आहे. सी-डी-इ-एफ-जी या रेषेने प्रतिवादीने त्याच्या हद्द ठराव मोजणीने जी हद्द ठरली ती दाखविली होती, ती नमूद केलेली आहे. नकाशातील सी-डी-एच-एफ-जी-आय या रेषेने दर्शविलेला भाग सर्व्हे नंबर ८४/४ ची मूळ अभिलेखाप्रमाणे हद्द आहे आणि त्याची खात्री मी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या हद्दींनुसार नकाशातील सी-डी-इ-एफ या रेषेने दर्शविलेला भाग सर्व्हे नंबर ८४/४ मध्ये लगतच्या जमीन मालकाने अतिक्रमित केलेला आहे, असे दिसते. मी मोजणीच्या वेळी प्रतिवादीकडून त्यांनी केलेल्या हद्द ठराव मोजणीचा नकाशा मागून घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने दिलेल्या तोंडी माहितीवरुन मी नकाशातील सी-डी-एच-एफ-जी-आय या रेषेसंबंधी टिप लिहिलेली आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, पोटहिश्श्यांची मोजणी केल्यावर नकाशा तयार करतेवेळी इंग्रजी आद्याक्षरांनी सर्व पोटहिस्से नकाशात दाखवावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, नकाशात मी दोन्ही पोटहिस्से इंग्रजी आद्याक्षरांनी दाखविलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नकाशातील लोखंडी तारेच्या कुंपणा संबंधीची टिप क्रमांक ९ मी अर्धवट दाखविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने नकाशात सी-डी-इ-एफ या रेषेने दर्शविलेल्या भागात अतिक्रमण करुन तारेचे कुंपण बांधलेले आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला सामील होवून मोजणीचे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चूकीचा अहवाल सादर केलेला आहे आणि मूळ अभिलेख आधारभूत मानून मोजणी केलेली नाही.

**समक्ष -** सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : १२ /०१ /२०१७** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

कुडाळ (कोमलसिंग राजपूत)

दिनांक : १२ /०१ /२०१७ दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग